मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आरटीओचे कामकाज होणार सुरळीत

**पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागातील कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत : मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय झाल्याने परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांचा संप मागे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय झाल्याने परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांचा संप मागे घेण्यात आला आहे. त्यामुळे तीन दिवसांच्या संपानंतर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागातील (आरटीओ) कर्मचारी शुक्रवारी (ता. २७) कामावर रुजू झाले आहेत. तीन दिवसांपासून रखडलेल्या कामांना गती मिळणार असून, नागरिकांची होणारी गैरसोय देखील टळणार आहे.




परिवहन विभागाने जास्तीत-जास्त सेवा ऑनलाइन करण्यावर भर दिला आहे. नागरिकांची बरीचशी कामे ऑनलाइन होत असली तरी कागदपत्रे मात्र आरटीओ कार्यालयात येऊनच जमा करावी लागतात. वाहनासंबंधित विविध कामांसाठी आरटीओमध्ये प्रत्यक्षरीता उपस्थित राहणे अनेकदा आवश्यक असते. नवीन परवाना काढणे. वाहन पासिंग, वाहन नावावर करून घेणे. यासह विविध कामांसाठी शेकडो नागरिक आरटीओत येतात. मात्र, गेल्या तीन दिवस मंगळवार (ता. २७) पासून आरटीओतील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे कार्यालयातील कामकाज ठप्प झाले होते. परिणामी नागरिकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागला. पिंपरी चिंचवड प्रादेशिक कार्यालयांतर्गत खेड, जुन्नर, आंबेगाव, मावळातील नागरिकांना देखील या ठिकाणी येतात. संपाबाबत माहिती नसल्याने अनेकांचे हेलपाटे झाले.

मागण्यांबाबत परिवहन आयुक्त कार्यालयात सर्व मागण्यांवर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. यात संघटनेच्या मागणीनुसार ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत वरिष्ठ लिपिक ते कार्यालय अधिक्षक पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यात येतील. तोपर्यंत पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. महसूल विभागानुसार बदल्या करण्याचे धोरण रद्द करण्यात आले. बदलीकरिता पूर्वीप्रमाणेच १५ विभागांतर्गतच बदल्या करण्याचेही मान्य केले. प्रशासनाने इतर मागण्यांवरही सकारात्मक निर्णय घेतल्याने बेमुदत संप स्थगित करण्यात आला. शुक्रवारपासून (ता. २७) कर्मचारी रुजू झाल्याने कामकाज सुरळीत सुरू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### या होत्या मागण्या

- पुणे परिवहन कार्यालयांतर्गत येणाऱ्या चार कार्यालयांतर्गतच बदली व्हावी
- पुणे महसूल कार्यालयांतर्गत येणाऱ्या पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या ठिकाणी बदलीचा नियम रद्द करावा
- रखडलेल्या पदोन्नती द्याव्यात
- कळसकर समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करावी

> विविध मागण्यांसाठी कर्मचारी संपावर गेले होते. त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाला आहे. त्यामुळे संप स्थगित करण्यात आला आहे. कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत. कामकाज सुरळीत सुरू झाले आहेत.
> - राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड.

## विनापरवाना वृक्षतोड प्रकरण, ताकीद देऊन कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द

**महापालिका उद्यान विभागाच्या चार कर्मचाऱ्यांचे केलेले सेवानिलंबन रद्द करण्यात आले आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

विनापरवाना वृक्षतोड करून लाकडांची परस्पर विक्री केल्या प्रकरणी महापालिका उद्यान विभागाच्या चार कर्मचाऱ्यांचे केलेले सेवानिलंबन रद्द करण्यात आले आहे. या कर्मचाऱ्यांवरील कारवाई शिथिल करून त्यांना केवळ सक्त ताकीद देण्यात आली आहे. पुन्हा असा प्रकार केल्यास कठोर कारवाई करण्यात येण्याची तंबी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली आहे. उद्यान असिस्टंट विभागाचे हॉर्टीकल्चर सुपरवायझर संतोष भिमाजी लांडगे यांच्यावर केलेली निलंबनाची कारवाई रद्द करत त्यांची वेतनवाढ स्थगित करण्यात आली आहे.





उद्यान सहाय्यक (माळी) मच्छिंद्र नामदेव कडाळे, भरत रामभाऊ पारखी आणि असिस्टंट हॉर्टीकल्चर सुपरवायझर संजीव प्रल्हाद राक्षे यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. वरिष्ठांची परवानगी न घेता, खासगी यंत्रणेमार्फत एकूण 64 झाडांची कत्तल केली होती. त्यात सुबाभळाची 58, कांचनची 2, कडुलिंबाची 2, पिंपळाचे एक तसेच, कांचनचे एक या जातीच्या झाडांची तोड करुन ती लाकडे उद्यान विभागात जमा न करता परस्पर बाहेर विकली असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. याप्रकरणी त्या कर्मचा-याचे सेवा निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. दरम्यान, त्यांनी एक लाख चार हजार रुपयांचा भरणा करून शिक्षा न करण्याची विनंती केली. त्यांच्यावरील दोषारोप शाबीत झाल्याने त्यांची एक वेतनवाढ रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत ग्रीन आर्मीचे प्रशांत राऊळ म्हणाले की, रिस्क घेऊन आम्ही अवैध (PCMC) वृक्षतोड उघडकीस आणतो. महापालिका कर्मचा-यांचा सहभाग सिद्ध केला जातो. त्यासाठी पाठपुरावा करतो. काही दिवस निलंबित केल्यानंतर ताकीद देऊन निलंबन रद्द केले जाते. हे चुकीचे आहे.

## सायन्स पार्कमध्ये आजपासून विनामूल्य विविध कार्यक्रम

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क व तारांगणतर्फे विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क व तारांगणतर्फे आज रविवार (दि.29) या कालावधीत विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या वेळात कार्यक्रम होतील.



प्रवेश विनिमूल्य आहे. शुक्रवार ते रविवारपर्यंत छायाचित्रकार तुषार कोडोलीकर यांचे भारतीय वारसा स्थळे विषयावरील छायाचित्रांचे प्रदर्शन असेल. दुपारी चार ते साडेपाच या वेळेत शुक्रवारी 'भारतीय वारसा स्थळे, दुर्गभ्रमंती व पर्यटन' विषयावर अनुराग वैद्य व विनायक बेलोसे; शनिवारी 'नामशेष होण्याच्या उंबरठ्यावरील पक्षीः निरीक्षण, पर्यटन आणि संवर्धन' विषयावर सुशांत पवार आणि रविवारी 'विज्ञान भागीरथीचे भगीरथ' विषयावर विठ्ठल रायगावकर यांची व्याख्याने होतील.

शुक्रवारी शालेय विद्यार्थांसाठी 'गिरीदुर्गांचे स्थापत्यशास्त्र दृष्टिकोनातून महत्त्व' विषयावर आंतरशालेय स्पर्धा होईल. विविध नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेल्या, अनेक वारसा स्थळे जपणाऱ्या आपल्या देशात पर्यटन करताना जागरूक व जबाबदार पर्यटक कसे व्हावे याबद्दल या कार्यक्रमांतून जनजागृती करण्यात येणार आहे.

# लोकनेते स्व. आमदार लक्ष्मण जगताप यांचा जनसेवेचा वसा आणि वारसा अविरतपणे चालविणार : शंकर जगताप

## अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत 2153 बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व भांडी संचाचे वाटप

**पुणे | प्रतिनिधी**

-देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' या विचारातून समाजातील शेवटच्या घटकातील, तळागाळातील सर्वसामान्य, कष्टकरी, गरजू नागरिकांपर्यंत केंद्र शासन असो, राज्य शासन असो अथवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका असेल या सर्वांच्या कल्याणकारी योजना पोहचविण्याची जबाबदारी आमच्यावर आहे आणि आम्ही ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. त्यामाध्यमातून लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांचा जनसेवेचा वसा आणि वारसा अविरतपणे चालविण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.



पिंपळे गुरव येथील भाजप कार्यालयात अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत सुरक्षा संच आणि गृहोपयोगी भांड्यांचा संच वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी गुजरातचे आमदार तथा माजी मंत्री श्री. जयद्रथसिंह परमार, माजी आमदार श्री. महेश रावत, माजी आमदार श्री. राकेश शहा, माजी स्थायी समिती अध्यक्ष श्री. राजेंद्र राजापुरे, माजी नगरसेविका सौ. उषा मुंढे, माजी नगरसेवक श्री. सागर आंघोळकर, स्वीकृत नगरसेवक महेश जगताप, श्री. नरेश जगताप, श्री. शशिकांत दुधारे, श्री. राहुल जवळकर, श्री. अमर आदियाल, श्री. दीपक काशीद, प्रभाग अध्यक्षा सौ. माधवी शिंदे, कामगार आघाडीचे अध्यक्ष श्री. नामदेव पवार, श्री. उमेश सकटे, श्री. मनोजकुमार मारकड, श्री. भारत मदने, श्री. संजय मराठे, श्री. दिलीप कांबळे सर, श्री. गणेश जगताप, श्री. साई कोंढरे, श्री. निलेश अष्टेकर, श्री. प्रसाद कस्पटे, श्री.शिवाजी कदम, श्री.राजू लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जगताप म्हणाले की, यापूर्वीही लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून शहरातील असंघटित कामगार, कष्टकरी वर्ग, घरेलू कामगार यांच्या आर्थिक सुरक्षेसाठी विमा योजना, साहित्य वाटप तसेच आरोग्य सुविधा पुरविण्यासंदर्भात उपक्रम राबविण्यात आले होते. लक्ष्मणभाऊंनंतर हा उपक्रम यापुढेही अखंडपणे सुरू ठेवण्याची जबाबदारीही आम्ही पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. शहरातील सर्वसामान्य असंघटित कामगार, घरेलू कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या पाठीशी आम्ही भक्कमपणे उभे आहोत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या माध्यमातून मागील वर्षी अटल सन्मान योजनेंतर्गत पिंपरीमध्ये साडे सात हजार कामगारांना गृहोपयोगी भांडी वाटप करण्यात आले होते. त्याचे नियोजन दीपक म्हेत्रे यांनी केले होते. तर सांगवीमध्ये मागील वर्षी २ हजार तर यावर्षी पुन्हा एकदा २,१५३ कष्टकऱ्यांना या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत या भांड्यांच्या संचचे वाटप करण्यात आले. याचे नियोजन अनिल कांबळे यांनी केले. त्याबद्दल कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी कौतुक केले

भविष्यात आम्ही या घरेलू कामगार, सफाई कामगार, वाहन चालक यांना एक विशेष प्रशिक्षण देणार आहोत. थोडक्यात घरेलू काम करणाऱ्या भगिनींना सध्या घरोघरी वापरण्यात येणारी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आहेत ती उपकरणे कशी चालवावीत यासंदर्भात हे प्रशिक्षण असेल. त्याचबरोबर प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांना एक प्रमाणपत्रही देण्यात येईल. जेणेकरून या भगिनींना त्यांच्या कामाचा चांगला मोबदला कामाच्या ठिकाणी मिळेल. अशाच पद्धतीचे प्रशिक्षण वाहन चालक असतील किंवा इतर कामगार त्यांनाही देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हे संपूर्ण प्रशिक्षण विनामूल्य आम्ही देणार असल्याचेही शंकर जगताप यांनी यावेळी सांगितले. आतापर्यंत अनेक असंघटित कामगारांनी आपली नोंद केलेली नाही त्यामुळे ते अजूनही या योजनेपासून वंचित आहेत. त्यामुळे या योजनेचा तसेच शासनाच्या इतरही योजनांचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त असंघटित कामगारांनी आपल्या नावाची नोंद करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. त्याचबरोबर आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तुम्हाला भूलथापा द्यायचा प्रयत्न करतील. मात्र त्यांना तुम्ही मतपेटीतून उत्तर द्या, असेही आवाहन जगताप यांनी लाभार्थ्यांना यावेळी केले.

# बोऱ्हाडेवाडी 'टी.पी. स्कीम'मधून रहिवाशी क्षेत्र वगळले..

## हरकती घेतलेल्या शेतकरी, भूमिपुत्रांना अखेर दिलासा...!

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील वाढीव हद्दीतील मौजे बोऱ्हाडेवाडी येथे नगर रचना योजना) मधून रहिवाशी क्षेत्र वगळण्याबाबतचा प्रस्तावाला महानगरपालिका सर्वसाधारण सभेत प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. रहिवाशी क्षेत्र वगळण्यात आल्यामुळे आता 'ग्रीन झोन'मध्ये टी.पी. स्कीम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे भूमिपुत्रांना दिलासा मिळाला आहे.



महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार महानगरपालिका प्रशासनाने नगर रचना योजना राबवण्यास सुरूवात केली होती. मात्र, बोऱ्हाडेवाडी येथील स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र यांनी निवासी क्षेत्र या योजनेतून वगळावे. या करिता योजनेला विरोध केला. भूमिपुत्रांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे या प्रकरणात पाठपुरावा करावा, अशी मागणी केली होती. दरम्यान, भूमिपुत्रांचा विरोध असल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने टी.पी. स्कीममधून बोऱ्हाडेवाडीतील रहिवाशी क्षेत्र वगळावे. या करिता महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

नगर रचना योजनामध्ये बोऱ्हाडेवाडीतील गट क्र. ग. नं. ६६ , ६७ , ६९, ७०, ८३, ८६, ३१, ३०, ३२ बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये शेती विभागातून रहिवास विभागात फेरबदल झालेला असल्याने यास शुद्धीपत्रक करुन हा भाग योजनेतून वगळण्यात आलेला आहे. त्यामुळे आता टी.पी. स्किम रहिवाशी क्षेत्र वगळून राबवावी. या करिता आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आणि नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या मागणीनुसार, रहिवाशी क्षेत्र वगळण्याबाबत आयुक्तांनी आश्वासन दिले होते. त्यानुसार, कार्यवाही झाली आणि या प्रस्तावाला महानगरपालिका सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली.

> **बोऱ्हाडेवाडी गावातील निवासी क्षेत्र नगर रचना योजना (टी.पी. स्कीम)मधून वगळण्याबाबत काही शेतकऱ्यांनी आग्रही मागणी केली होती. त्यानुसार, महानगरपालिका प्रशासन, नगर रचना विभागाकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. महानगरपालिका प्रशासनाने टी.पी. स्कीममधून विरोध असलेल्या नागरिकांचा भाग वगळण्याबाबत प्रस्तावाला मान्यता दिली आहे. रहिवाशी क्षेत्र वगळून टी.पी. स्कीम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे बोऱ्हाडेवाडी-मोशी परिसराचा सर्वसमावेश विकासाला चालना मिळेल, असा विश्वास आहे.**
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# नऊ वर्षानंतर बोपखेलवासीयांना दिलासा

## बोपखेल आणि खडकीला जोडणारा पूल पूर्ण



**पुणे | प्रतिनिधी**

बोपखेल व खडकीला जोडणाऱ्या मुळा नदीवरील पुलाचे काम पूर्ण झाले आहे. पुलाचे लवकरच लोकार्पण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे नऊ वर्षानंतर बोपखेलवासीयांना दिलासा मिळणार आहे.

बोपखेल गावासाठी दापोडी येथील कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरींग (सीएमई) हद्दीतून जाणारा नागरी रस्ता मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 13 मे 2015 रोजी बंद करण्यात आला होता. त्यामुळे बोपखेल गावातील रहिवाशांना दापोडीकडे जाण्याकरीता पूर्वी लागणारे दोन किलोमीटरचे अंतर रस्ता बंद झाल्यामुळे सुमारे 16 किलोमीटर झाले. त्यामुळे बोपखेल येथील नागरीकांना पिंपरी-चिंचवड शहरात ये-जा करण्यासाठी भोसरी किंवा विश्रांतवाडी, खडकी मार्गावरुन सुमारे 15 ते 16 किलोमीटर अंतराचा वळसा घालावा लागत होता.

त्यामुळे नागरिकांसह, विद्यार्थी व कामगारांची मोठी गैरसोय होत होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बोपखेल ते खडकी असा मुळा नदीवर 1856 मीटर अंतराचा पुल बांधण्याचे काम महापालिकेने हाती घेतले. पूल व जोडरस्त्याचे काम टी ॲण्ड टी इन्फ्रा कंपनीने केले. चार वर्षांनंतर पुलाचे काम पूर्ण झाले आहे. छोटी कामे शिल्लक असून लवकरच पूर्ण होतील. त्यानंतर पूल वाहतुकीस खुला केला जाणार असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

# अंदाजपत्रकात हवामान उपाययोजनांना स्वतंत्र स्थान

## पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी महापालिकेचे पुढच्या वर्षी स्वतंत्र अंदाजपत्रक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. हवामानाचा शहरातील विविध घटकांवर होणारा परिणाम लक्षात घेता विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवण्याच्या दृष्टीने महापालिकेने हवामान विषयाला विशेष स्थान दिले आहे. महापालिकेच्या येत्या वार्षिक अंदाजपत्रकात हवामान अंदाजपत्रकाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात येत आहे, अशी माहिती प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे.



जागतिक तापमानवाढ, अतिउष्णतेच्या तीव्र लाटा, ऋतूमानातील बदल याबाबतचा सर्वांगीण विचार करून सर्वांची याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीनेही विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, हवामान अंदाजपत्रकाद्वारे कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सुनियोजित प्रयत्न करून त्यामध्ये प्रामुख्याने हवा प्रदूषण करणाऱ्या घटकांवर निर्बंध घालून पर्यावरणपूरक गोष्टींचा समावेश करून प्रदूषण नियंत्रण करून स्थानिक पर्यावरण सुधारणे हा यामागील उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांनी तसेच देश व राज्य स्तरावर अनेक शासकीय, निमशासकीय कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी हवामान अंदाजपत्रक या संकल्पनेचा समावेश केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकाही या संकल्पनेचा स्वीकार करून पुढील वार्षिक अंदाजपत्रकामध्ये हवामान अंदाजपत्रकाचा समावेश करीत आहे.

हवामान अंदाजपत्रकाबाबत माहिती देताना महापालिकेचे वित्त संचालक प्रवीण जैन म्हणाले, हवामान अंदाजपत्रक संकल्पनेसंदर्भात मार्गदर्शक ध्येय, धोरणे, उद्दिष्टे, कार्यपद्धती, सूचना, अंदाज पत्रक माहिती संकलन नमुने याबाबत खासगी संस्थेमार्फत अभ्यास करण्यात येऊन सूचना घेण्यात आल्या. त्या धोरणांचा व मार्गदर्शक सूचनांचा महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे व महापालिकेच्या विभागांमार्फत अंमलबजावणी करून महापालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक प्रकाशित करण्यास महापालिका सभेची मान्यता आवश्यक होती, त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

# महापालिकेच्या 'दिव्यांग भवन फाउंडेशन'मध्ये 43 कर्मचाऱ्यांची नियुक्ती

## आतापर्यंत 150 हून अधिक दिव्यांगानी घेतला विविध सुविधांचा लाभ : शहरातील जास्तीत जास्त दिव्यांगानी लाभ घेण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा दिव्यांगांच्या हक्कासाठी पुढाकार घेण्यामध्ये संपुर्ण देशामध्ये अग्रेसर असल्याचा नावलौकिक आहे.महानगरपालिकेने आजपर्यंत दिव्यांगांचे हित जोपासण्यासाठी व त्यांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक प्रभावी योजना राबविल्या आहेत. त्याचधर्तीवर, महानगरपालिकेने कंपनी कायदा कलम ८ अंतर्गत, मोरवाडी, पिंपरी येथे 'दिव्यांग भवन फाउंडेशन'ची स्थापना केली. दिव्यांग भवनाच्या माध्यमातून २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींवर उपचार (थेरपी), दिव्यांगास सहाय्यभूत उपकरणांचे वितरण, दिव्यांगाचे कौशल्य विकास व त्यांचे पुनर्वसन व सक्षमीकरण करण्यासाठी कार्यरत आहे.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अनुदानीत असलेल्या 'दिव्यांग भवन फाउंडेशन'साठी ४३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये एकूण ३१ संवर्गामध्ये ४० उमेदवारांची निवड करण्यात आली तर दुसऱ्या टप्प्यामध्ये ३ संवर्गामध्ये ३ उमेदवारांची निवड करण्यात आली. कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रक्रिया पुर्ण झाली असून सर्व पात्र उमेदवार कामावर रुजू झालेले आहेत. अशी माहिती दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांनी दिली.

'दिव्यांग भवन फाउंडेशन' येथे नियोजनानुसार आजतागायत १५० पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्तींनी थेरपी सुविधेचा लाभ घेतला आहे. त्यासोबतच दिव्यांग भवन येथे पार पडलेल्या जनजागृतीपर कार्यक्रमामध्ये ३०० हून अधिक दिव्यांगांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला. त्यासोबतच, १२० दिव्यांगांना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत उपकरणे देण्यात आली आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व यूडीआयडी (UDID) कार्ड धारक दिव्यांग व्यक्तींनी दिव्यांग भवन येथे भेट देऊन थेरपी सारख्या सेवा-सुविधांचा लाभ घ्यावा,असे दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांनी सांगितले.

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या दिव्यांग भवन येथे लवकरच 'दिव्यांग कक्ष' सुरु करणार आहेत,अशी माहिती सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट यांनी दिली.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या दिव्यांग भवनसाठी नवनियुक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरातील सर्व दिव्यांग व्यक्तींना सेवा-सुविधा देण्यासाठी महापालिका सदैव प्रयत्नशील आहे. दिव्यांग भवन येथे नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी दिव्यांग भवन येथे येणाऱ्या प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समानूभुतीने सेवा द्यावी.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

> दिव्यांग भवन येथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून कर्मचारी कामावर रुजू सुध्दा झाले आहेत. त्याचबरोबर, शहरातील १५० हून अधिक दिव्यांगांनी विविध सेवा-सुविधेचा लाभ सुध्दा घेतला आहे. याचबरोबर, येत्याकाळामध्ये लवकरच घरोघरी जाऊन दिव्यांग सर्वेक्षण करण्यात येणार आहे.
>
> **– प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

> दिव्यांग भवनमध्ये नवनियुक्त कर्मचारी कामावर रुजू झाल्यामुळे शहरातील दिव्यांगांना अधिक जलद सुविधा देण्यासाठी दिव्यांग भवनची कार्यक्षमता वाढली असून येत्याकाळामध्ये पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील जास्तीत जास्त दिव्यांगांना नियोजनबद्ध पद्धतीने सर्व थेरपीचा लाभ मिळणार आहे.
>
> **– तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# महाविकास आघाडीकडून आयुक्तालयासमोर आंदोलन

## महाविद्यालयाच्या आवारात अत्याचार प्रकरणी संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील एका महाविद्यालयाच्या आवारात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणात संस्थाचालक, विश्वस्तांना वेळकाढूनपणाची भूमिका घेतली. याप्रकरणी संबंधित महाविद्यालयाचे विश्वस्त आणि पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी महाविकास आघाडीने केली. पोलीस आयुक्तयालयासमोर महाविकास आघाडीकडून शुक्रवारी धरणे आंदोलन करणअयात आले.

काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) शहराध्यक्ष संजय मोरे, गजानन थरकुडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) प्रशांत जगताप यांच्यासह रिपब्लिकन विद्यार्थी सेना, दलित पँथर ऑफ इंडिया, विद्यार्थी विकास मंच संघटना आंदोलनात ससहभागी झाले होते. शहरातील एका महाविद्यालयात अल्पयवयीन युवतीवर चौघांनी अत्याचार केले.



आरोपींनी अमली पदार्थांचे सेवन केले होते. संबंधित महाविद्यालयाचे विश्वस्त सचिन सानप यांना या घटनेची माहिती होती. त्यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. त्याने पीडित युवतीच्या वडिलांवर दबाव टाकला. त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. सानप मंत्रीमंडळातील एका मंत्र्याच्या निकटवर्तीय आहेत. दबावापोटी पोलिसांनी त्यांच्याविरूद्ध कारवाई केली नाही,

> महाविद्यालयीन युवतीवर झालेल्या अत्याचाराचे प्रकरण गंभीर आहे. महाविद्यालयीन प्रशासनाने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. महाविद्यालयाच्या आवारातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले पाहिजे.
> **- संजय मोरे, शहरप्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे**

> अमली पदार्थांचे सेवन करून आरोपींनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला आहे. हे सर्व संस्थाचालकाला माहिती असूनही त्यांनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणातील पोलिसांनी तपासात त्रुटी न ठेवता, मुलीला न्याय द्यावा. संबंधित संस्थेत काही जण चुकीचे काम करीत आहेत. विश्वस्तांविरुद्ध पोलिसांनी कारवाई करावी. युवतीला जर न्याय मिळाला नाही, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करु.
> **- रवींद्र धंगेकर, आमदार, काँग्रेस.**

असा आरोप यावेळी करण्यात आली. पोलीस आयुक्तालयासमोर आंदोलकांनी घोषणबाजी केली. 'अल्पवयीन मुलीला न्याय द्या, महाविद्यालयाच्या विश्वस्तांना आरोपी करा, त्यांच्याविरूद्ध कठोर कारवाई करा', अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.



# नाट्यगृहांमध्ये दाखवा चित्रपट!

## उत्पन्न वाढेल, चित्रपटसृष्टीलाही फायदा : गार्गी फुलेंचा सुधीर मुनगंटीवारांकडे प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यामध्ये अनेक ठिकाणी नाट्यगृहे आहेत. पण तिथे दररोज नाटकांचे प्रयोग होत नाहीत. त्या ठिकाणी जर चित्रपटांचे शो लावण्याची परवानगी दिली, तर चित्रपटसृष्टीला त्याचा फायदा होईल. तसेच नाट्यगृहांचे उत्पन्न देखील वाढेल. याविषयीचा प्रस्ताव अभिनेत्री गार्गी फुले यांनी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांना केली आहे.

पूर्वी संगीत आणि सामाजिक नाटकांचा सुवर्णकाळ या महाराष्ट्राने प्रत्येक नाट्यगृहात अनुभवलेला आहे. कारण तेव्हा नाटकांचे खेळ जास्त व्हायचे तसेच काही मोजकेच चित्रपट प्रदर्शित व्हायचे. परंतु, काळ बदलला आणि चित्रपटांची संख्या वाढल्यामुळे चित्रपटगृह अस्तित्वात आली. परंतु, आताचा काळ लक्षात



घेता पुन्हा नाट्यगृहांमध्ये चित्रपट प्रदर्शित करण्याची वेळ आली आहे. एक पडदा चित्रपटगृह बंद पडल्यामुळे किंवा त्याची अवस्था बिकट असल्यामुळे प्रेक्षक एक पडदा चित्रपटगृहात चित्रपट पाहिला जात नाहीत. त्यातून मराठी चित्रपटांची अवस्था अजून बिकट आहे. मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये मराठी चित्रपट पाहणे प्रेक्षकांच्या खिशाला परवडण्यासारखे नाही. त्यावर उपाय म्हणून राष्ट्रवादी सांस्कृतिक विभागातर्फे नाट्यगृहांमध्ये चित्रपटाचे शो करण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव राज्य सरकारला दिला आहे.

नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपटांचे खेळ दाखविले तर तिकिट देखील

> महाराष्ट्रातील सर्वच नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपट दाखविण्यात यावा याबाबतीत सांस्कृतिक मंत्र्यांना निवेदन देऊन चर्चा झाली. चर्चेनंतर आमचे निवेदन मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठवण्याचे आदेश सांस्कृतिक मंत्र्यांनी त्या ठिकाणी दिले, कारण शहरातील नाट्यगृह ही सगळी महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असून महाराष्ट्राचे नगरविकास मंत्री हे स्वतः हा मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांच्या मार्फत पुढील कार्यवाहीचे आदेश काढण्यास सांगितले.
> **- बाबासाहेब पाटील, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभाग**

कमी होऊ शकते. तसेच नाट्यगृहे रिकामे राहणार नाहीत. त्यांचे उत्पन्न वाढेल. मराठी चित्रपटांना न येणारे प्रेक्षक मराठी चित्रपटाकडे वळतील. राज्यात वर्षभरात शंभर मराठी चित्रपटांची निर्मिती होते. पण चित्रपटांना योग्य थिएटर मिळत नाहीत. त्यामुळे प्रेक्षकांपर्यंत ते पोचत नाहीत. या सर्व दृष्टीने हा प्रस्ताव देण्यात आला आहे.

> नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपटांचे खेळ दाखविल्यास त्याचा फायदा निर्माते आणि नाट्यगृह या दोघांनाही होऊ शकणार आहे. त्याबाबत आमची आग्रही मागणी आहे. सांस्कृतिक मंत्री आणि सरकारने त्यावर विचार करायला हवा
> **- मकरंद अनासपुरे, अभिनेता.**